**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५४/२०२१</u>**

**<u>CNR No. MHSO060007352021</u>**

बाळू मोरे वगैरे

वि.

ग्रामपंचायत, चळे वगैरे

## <u>आदेश निशाणी क्र. ५ वर</u>

या दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिवादी क्र. १, २, ४ आणि ६ यांनी गाव नकाशात नमूद केलेल्या पश्चिम–उत्तर कोप–यातील चळे ते खरसोळी या रस्त्याचे व्यतिरिक्त दावा मिळकतमध्ये नवीन रस्ता निर्माण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळावा अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

प्रकरणातील संक्षीप्त हकीकत पुढीलप्रमाणे आहे –

०२. मौजे चळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट नं. ५९८/१/ अ क्षेत्र ० हे ५९ आर ही वादी यांचे मालकीची शेतजमीन आहे. येथून पुढे संक्षेपासाठी त्यास विवाद्य मिळकत असे संबोधण्यात येत आहे. प्रतिवादी क्र. १ ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. त्याचा कारभार प्रतिवादी क्र. २ ते ५ यांचे अंतर्गत चालतो. प्रतिवादी क्र. ६ व ७ हे शासकीय अधिकारी आहेत.

०३. वादी यांच्या मिळकतीच्या पश्चिम उत्तर कोप–यातून पुर्वीपासून चळे ते खरसोळी हा रस्ता आहे. वादी व गावातील लोक त्या रस्त्याचा उपयोग करतात. दिनांक २२/०६/२०२१ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी वादी यांना बेकायदेशीर नोटीस पाठवली. त्यानंतर ग्रामपंचायत, चळे यांनी दिनांक २१/०७/२०२१ रोजी ठराव घेतला. त्यानुसार पोलीस बंदोबस्तामध्ये चळे ते खरसोळी रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याचे ठरवण्यात आले. सदर ठराव हा चुकीचा व राजकीय द्वेषबुध्दीने घेतलेला आहे. त्या आधारे

विवाद्य मिळकतमधील पुर्वीचा रस्ता फोडून नवीन पुर्व पश्चिम चालीचा रस्ता तयार करण्याचा प्रतिवादी यांचा हेतू आहे. त्यानुसार प्रतिवादी क्र. १ व २ यांनी पोलीस संरक्षण मिळणेसाठी पोलीस स्टेशनला पत्र दिले. त्यामुळे हा दावा व सदर तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठीचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

०४. प्रतिवादी क्र. १ व २ हे प्रकरणात त्यांचे वकिलांमार्फत हजर झाले. त्यांनी निशाणी क्र. ३० प्रमाणे त्यांची कैफियत व तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठीच्या अर्जाला म्हणणे दिलेले आहे. प्रतिवादी क्र. ३, ४, ६ व ७ हे देखील हजर झाले. परंतु त्यांनी त्यांची कैफियत दिलेली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३, ४, ६ व ७ यांचे कैफियतशिवाय दावा पुढे चालवण्याचा आदेश करण्यात आला. प्रतिवादी क्र. ५ यांना अद्याप समन्सची बजावणी झालेली नाही.

०५. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांची कैफियत व तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठीच्या अर्जाला म्हणणे देऊन असे नमूद केले की, चळे–खरसोळी–तारापूर हा रस्ता पुर्वीपासून अस्तित्वात आहे. प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्यामुळे त्या रस्त्याची दुरावस्था झाली आहे. लगतचे शेतकरी यांनी त्याचा गैरफायदा घेऊन त्यावर अतिक्रमण केले आहे. शासनामार्फत त्या रस्त्याच्या डागडुजीचे काम सुरु झाले आहे. मंजूर निधी मुदतीत वापरला नाही तर तो इतरत्र वर्ग होईल. त्या रस्त्याचा गावातील लोक, शाळेतील विद्यार्थी व इतर लोक वापर करत आहेत. पाठपुरावा केल्यामुळे ग्रामपंचायतला सदर रस्ता दुरुस्तीसाठी निधी मिळालेला आहे. केवळ विकास होऊ नये म्हणून अडथळा करण्यासाठी हा खोटा दावा दाखल केला आहे.

०६. यापुर्वी देखील वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे विरुध्द दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पंढरपूर यांचे न्यायालयात नियमित दिवाणी दावा नं. ४८९/२०१९ हा दाखल केला होता. तो प्रलंबित आहे. वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेले नाहीत. त्यामुळे त्यांना कोणताही विशेष दिलासा देता येणार नाही. या कारणांमुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नमूद केले.

०७. वादी यांचे वकील श्री. एम. व्ही. कसबे तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांचे वकील श्री. व्ही. के. जाधव यांचा युक्तीवाद ऐकला. दावा, तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठीचा अर्ज, त्यावर प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिलेली कैफियत व म्हणणे तसेच रेकॉर्डवरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. या अर्जाच्या अंतिम व योग्य निर्णयासाठी मी पुढीलप्रमाणे मुद्दे निश्चित केले. त्यावरील माझे उत्तर मी पुढील कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| | मुददे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | वादी यांना प्रथमदर्शनी केस आहे काय ? | ... | नाही. |
| २. | न्यायाचा समतोल वादी यांच्या बाजूने आहे काय ? | ... | नाही. |
| ३. | प्रस्तावित तुर्तातुर्त मनाई न दिल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... | नाही. |
| ४. | अंतिम आदेश कोणता ? | ... | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्र. १ बाबत**

०८. प्रतिवादी क्र. १ ही ग्रामपंचायत तर प्रतिवादी क्र. २ हे त्या ग्रामपंचायतचे सरपंच आहेत. राजकीय द्वेषापोटी चळे ते खरसोळी रस्ता रुंदीकरण, दुरुस्ती व त्यावरील अतिक्रमण काढण्याचे काम प्रतिवादी क्र. १ व २ हे करत आहेत. त्यामुळे विवाद्य मिळकतमधील वादी यांचे क्षेत्रातील सदर रस्त्याऐवजी दुस–या बाजुने नवीन रस्ता तयार करण्याचा प्रयत्न प्रतिवादी क्र. १ व २ करत आहेत असे वादी यांचे कथन आहे. विवाद्य मिळकतमध्ये पुर्वीपासून रस्ता आहे. त्या रस्त्याचा वापर सर्वजण करत आहेत. ही बाब उभय पक्षकार यांना मान्य आहे. दाखल कागदपत्रे व ग्रामपंचायत यांनी केलेल्या ठरावानुसार सदर

रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने निधी मंजूर केलेला आहे. तसेच त्या रस्त्यालगतचे शेतकरी यांनी त्या रस्त्यावर अतिक्रमण केले आहे. अतिक्रमण काढून डागडुजी होऊन रस्ता गावातील लोकांना रस्ता खुला होणे व निधीचा योग्य प्रकारे वापर होणे आवश्यक आहे. गावच्या सार्वजनिक विकासाबाबतचा हा प्रश्न असल्यामुळे त्यास स्थगिती देणे योग्य होणार नाही.

०९. या अगोदर देखील वादी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पंढरपूर यांचे न्यायालयात याच वादविषयाबाबत नियमित दिवाणी दावा नं. ४८९/२०१९ हा दाखल केला होता असे दिसून येते. नुकताच तो दावा काढून घेतला आहे असे वादी यांनी नमूद केले आहे. परंतु तो दावा प्रलंबित असताना हा दावा दाखल करण्यात आलेला आहे. साधारणपणे तो दावा व हा दावा यामधील वादविषय हा सारखाच आहे. न्यायालयात अगोदरच या वादविषयाबाबत दावा दाखल असलयाची माहिती वादी यांनी दिलेली नाही. हा नवीन दावा दाखल करुन केवळ स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कामकाजात न्यायालयामार्फत हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न असल्याचे दिसून येते. प्रस्तावित रस्त्याचे काम न झाल्यास गावातील लोक, विद्यार्थी व इतर लोक यांना त्रास होणार आहे. अगोदरच विवाद्य मिळकतमधून चळे ते खरसोळी हा रस्ता आहे. त्या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरु होणार आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी वादी यांना केस नाही असा निष्कर्ष मी नोंदवत आहे. त्यानुसार मी मुद्दा क्र. १ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>** –

१०. गावातील लोकांच्या वापरासाठी चळे ते खरसोळी या सार्वजनिक रस्त्याची डागडुजी व दुरुस्ती प्रतिवादी क्र. १ व २ हे करत आहेत. तसे झाल्यास वादी यांच्या विवाद्य मिळकतमधून चुकीच्या बाजुने रस्ता नेतील अश काल्पनीक भीती वादी यांनी नमूद केली आहे. प्रस्तुत रस्ता गावच्या नकाशामध्ये आहे. त्याची दुरुस्ती झाली तर सर्व नागरीकांना त्याचा फायदा होणार आहे. त्यामुळे केवळ वादी यांच्या मागणीनुसार सार्वजनिक हिताचे काम

थांबवणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल हा वादी यांचे बाजुने नाही असे मी नमूद करतो. त्यानुसार मुददा क्र. २ चे उत्तर मी 'नकारार्थी' देत आहे.

**मुद्दा क्र. ३ बाबत** –

११. सार्वजनिक हितासाठी रस्त्याचे कामकाज होणे गरजेचे आहे. त्या रस्त्यावर लगतचे शेतकरी यांनी अतिक्रमण केलेले आहे. ते अतिक्रमण काढणे गरजेचे आहे. त्यासाठी सक्षम प्राधिकारी यांनी परवानगी दिली आहे. रस्ता दुरस्तीसाठी शासनाने निधी मंजूर केला आहे. त्याचा तातडीने विनयोग होणे गरजेचे आहे. निधीचा वापर होऊन रस्ता पुर्ण झाल्यास गावातील लोक, विद्यार्थी यांना त्याचा उपयोग करता येईल. रस्त्याचे कामकाज पुर्ण झाल्यामुळे वादी यांचे कोणतेही अपरीमित नुकसान होणार नाही. सबब मी मुददा क्र. ३ चे उत्तर मी 'नकारार्थी' देतो.

**मुद्दा क्र. ४ बाबत** –

१२. मुददा क्र. १ ते ३ चे नकारार्थी उत्तर मी दिले आहेत. वादी यांना प्रथमदर्शनी केस नाही. न्यायाचा समतोल वादी यांच्या बाजूने नाही. तसेच प्रस्तावित तुर्तातुर्त मनाई हुकूम दिला नाही तर वादी यांचे कोणतेही अपरिमीत नुकसान होणार नाही असे निष्कर्ष मी नोंदवलेले आहेत. त्यामुळे मुददा क्र. ४ च्या उत्तरासाठी मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. खुल्या न्यायालयात आदेश जाहीर केला.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2022.02.23 12:55:16 +0530

दि. २२/०२/२०२२

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

## CERTIFICATE

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 23/02/2022 |
| Order uploaded on | : | 23/02/2022 |